# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.12.2025** **वार:शुक्रवार**

1. तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचं नवी दिल्लीत आगमन
2. तंबाखू आणि तत्सम वस्तूंवर अतिरिक्त उत्पादन शुल्क लादणाऱ्या केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयकाला संसदेची मंजुरी
3. मुंबई गोवा महामार्गाचं काम पुढच्या वर्षी एप्रिलपर्यंत पूर्ण होईल-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ग्वाही
4. डिजिटल सात बारा उताऱ्याला कायदेशीर मान्यता; महसूल विभागाच्या संकेतस्थळावरून 15 रुपयात काढता येणार आणि
5. मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेत महाराष्ट्राचा विश्वविक्रम

**<u>पुतीन दौरा</u>**

तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचं काल नवी दिल्लीत आगमन झालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. दोन दिवसांच्या या दौऱ्यादरम्यान पुतिन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करणार आहेत. या दौऱ्या दरम्यान दोन्ही देशांमध्ये व्यापार, आरोग्यसेवा, तसंच आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि माध्यमांशी संबंधित अनेक करारांवर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देखील पुतीन यांची भेट घेणार असून आज त्यांनी पुतीन यांच्या सन्मानार्थ मेजवानीचं आयोजन केलं आहे. तत्पूर्वी काल दोन्ही देशांच्या विविध मंत्र्यांमध्ये नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली.

**<u>संसद</u>**

केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयकाला काल संसदेची मंजुरी मिळाली. यामुळं तंबाखू आणि तंबाखू जन्य पदार्थांवर जीएसटी अधिभार रद्द झाल्यावर अतिरीक्त उत्पादन शुल्क लादण्याचा मार्ग मोकळा होईल. सिगारेटवर अतिरीक्त शुल्क लादल्यानंतर मिळणारा अतिरीक्त महसूल वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यांनाही दिला जाईल असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना दिलं. अधिकाधिक शेतकऱ्यांनी तंबाखू ऐवजी इतर पीकांची लागवड करावी यासाठी सरकारनं विविध योजना आणल्या आहेत. यामुळं महाराष्ट्रासह विविध राज्यातल्या शेतकऱ्यांनी 1 लाख हेक्टरहून अधिक जागेवर इतर पीकं लावायला सुरुवात केल्याचं त्या म्हणाल्या.

देशातल्या महामार्गांवर सध्या पथकर आकारण्यासाठी असलेली व्यवस्था येत्या वर्षभरात बंद करुन, त्याऐवजी विना अडसर इलेक्ट्रॉनिक प्रणाली बसवली जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नीतीन गडकरी यांनी काल लोकसभेत सांगितलं. मुंबई-गोवा महामार्गाचं काम 89 टक्के पूर्ण झालं असून, पुढच्या वर्षी एप्रिल महिन्यापर्यंत ते पूर्ण होईल अशी ग्वाही गडकरी यांनी दिली, ते म्हणाले.....

**ये रास्ता दो हज़ार नौ में शुरू हुआ और मैं मंत्री दो हज़ार चौदह में बना हूँ, तो ये पुराने स्टेट पीडब्ल्यूडी के उस समय के सरकार को दिया हुआ था। उन्होंने शुरू किया यहाँ लैंड एक्शन के प्रॉब्लम थे अभी तक बहुत कॉन्ट्रैक्टर बदल गए। क्या कारण है मालूम नहीं काफी कारवाई भी की गई और अब लगभग आईटी नाइन पॉइंट ट्वेंटी नाइन पर्सेंट काम पूरा हुआ है और इस साल एप्रिल के अंदर ये complete road पूरा होगा और इसमें कोई तकलीफ नहीं होगी और इसको बहुत डिले हुआ है ये मैं स्वीकार करता हूँ।**

**बावनकुळे**

राज्य सरकारनं डिजिटल सात बारा, आठ अ आणि फेरफार उतारे कायदेशीरदृष्ट्या वैध ठरवण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. महसूल विभागाच्या bhulekh.mahabhumi.gov.in या वेबसाइटवरुन डिजिटल स्वरुपात सातबारा काढता येणार आहे. यासाठी 15 रुपये शुल्क आकारलं जाणार आहे. तलाठ्याच्या सही-शिकयाची गरज असणार नाही. डिजिटल स्वाक्षरी, QR कोड, आणि 16 अंकी पडताळणी क्रमांक असलेले सात बारा, आठ अ आणि फेरफार उतारे सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग आणि न्यायालयीन कामांसाठी पूर्णपणे वैध असतील. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांना निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

**महाडीबीटी**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजने'चा लाभ आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार आहे. शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांसाठी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी ही योजना महत्त्वाची आहे. पूर्वी ऑफलाईन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचं भरणे यांनी सांगितलं. मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

**सौरकृषीपंप**

महाराष्ट्रानं 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत विश्वविक्रम केला आहे. महावितरणनं एकाच महिन्यात 45 हजार 911 सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये नोंद झाली असून गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज छत्रपती संभाजीनगरच्या ऑरिक सिटी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**नौदल दिन**

देशभरात काल नौदल दिन साजरा झाला. मुंबईत नेव्हल डॉकयार्ड इथं यानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी नौदलाच्या पश्चिम मुख्यालयाच्या कार्मिक विभागाचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल राहुल गोखले यांनी नेव्हल डॉकयार्ड इथल्या गौरव स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना आदरांजली वाहिली.

**दिव्यांग पुरस्कार**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त नुकतेच राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तिकरण पुरस्कार प्रदान करण्यात आले. दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत संस्था आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. महाराष्ट्रातील अनेक व्यक्ती आणि संस्थांना विविध श्रेणींमध्ये हा सन्मान मिळाला. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**नागपूरच्या अबोली जितना यांना सर्वोत्कृष्ट दिव्यांगजन पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. जितना या नागपूरच्या पहिल्या व्हीलचेअर मॉडेल आणि प्रेरक वक्ता म्हणून ओळखल्या जातात. पुण्यातील भाग्यश्री मनोहर नादी मित्तला कन्ना यांनाही पुरस्कार मिळाला. त्या श्रवण बाधित असूनही कला आणि व्यावसायिक कौशल्य शिक्षिका म्हणून त्यांनी 500 हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केलं आहे, तसंच ऑलिम्पिकमध्ये देशाचं प्रतिनिधित्व केलं आहे. पुण्यातील आणखी एक पुरस्कार विजेती धृती रांका हिला श्रेष्ठ दिव्यांग बाल-बालिका श्रेणीत पुरस्कार मिळाला. धृती, टिकलर आर्टची संस्थापक असून न्यूरो-डायव्हर्स कलाकारांच्या आजीविकेला प्रोत्साहन देते आणि तिनं शार्क टँक इंडियासह**

**अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. विलेपार्ले इथल्या प्रसिद्ध ऑडिओलॉजिस्ट आणि समाजसेविका देवांगी दलाल यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला. जोश फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी 2 हजाराहून अधिक मुलांना मोफत श्रवण यंत्र आणि थेरपी प्रदान केली आहे. संस्था श्रेणीत मुंबईतील जय वकील फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर या संस्थेला बौद्धिक आणि विकासात्मक दिव्यांगता असलेल्या व्यक्तींच्या सशक्तिकरणासाठी सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून गौरविण्यात आलं तर मुंबईतीलच डिजिटल सुगमता क्षेत्रात महत्त्वाचं कार्य करणाऱ्या बॅरियर ब्रेक सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडला सर्वोत्कृष्ट सुगम्य माहिती तंत्रज्ञान श्रेणीतील पुरस्कार मिळाला.**

**बालविवाह मुक्त भारत**

बालविवाहमुक्त भारतासाठी शंभर दिवसांच्या राष्ट्रीय जागरुकता अभियानाला कालपासून प्रारंभ झाला. केंद्रीय महिला आणि बालकल्याणमंत्री अन्नपूर्णादेवी यांनी नवी दिल्लीत या अभियानाच्या पहिल्या वर्धापनदिनी, या मोहिमेचं उद्घाटन केलं. पुढच्या पाच वर्षांत देश बालविवाहमुक्त करण्याचं सरकारचं उद्दीष्ट आहे, असं त्यांनी सांगितलं. वर्षभर चालणाऱ्या या अभियानांतर्गत देशभरातल्या शैक्षणिक संस्था तसंच पंचायतींमध्ये प्रबोधनपर विविध कार्यक्रम राबवले जाणार आहेत.

**दत्तजयंती**

राज्यात सर्वत्र काल दत्त जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. सांगली जिल्ह्यात श्रीक्षेत्र औदुंबर, नांदेड जिल्ह्यातील माहूरगडावरच्या दत्तमंदिरात, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र देवगड संस्थान अणि अहिल्यानगर इथल्या दत्त मंदिरातही दत्त जन्म उत्सव काल मोठ्या उत्साहात पार पडला.

**चेतक महोत्सव**

नंदुरबार जिल्ह्यातल्या सारंगखेडा इथल्या एकमुखी दत्तमंदिरातही काल भाविकांची दर्शनासाठी रिघ लागली होती. दत्तजयंतीचं औचित्य साधत सारंगखेडा इथं दरवर्षी मोठ्या यात्रोत्सवाचं आयोजन केलं जातं. यातील घोडे बाजाराला चालना देण्यासाठी इथं चेतक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते या महोत्सवाचं काल उद्घाटन झालं. या महोत्सवाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी राज्य शासन भक्कमपणे पाठीशी असल्याचं प्रतिपादन रावल यांनी यावेळी केलं.

**बाजार समित्या- नवी मुंबई**

प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या मागणीसाठी राज्यभरातील बाजार समित्या आज बंद राहणार आहेत. महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने हा बंद पुकारण्यात आला आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज कोरडं हवामान असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.